# नाशिक महानगरपालिका
## शिक्षण विभाग

### आमच्याबद्दल

शिक्षण ही आर्थिक विकास, सामाजिक परिवर्तन, आधुनिकीकरण आणि राष्ट्रीय एकात्मतेची गुरुकिल्ली आहे.

१९८६ मध्ये तयार करण्यात आलेल्या आणि १९९२ आणि २०२० मध्ये सुधारित केलेल्या राष्ट्रीय शिक्षण धोरणाची उद्दीष्टे - तर्कसंगत विचार आणि कृती करण्यास सक्षम, करुणा आणि सहानुभूती, धैर्य आणि लवचिकता, विज्ञानवादी, तसेच सर्जनशील कल्पनाशक्ती आणि ठोस नैतिक मूल्यांचा आधार असलेले चांगले नागरिक तयार करणे हे आहे. आपल्या राज्यघटनेने परिकल्पित केल्याप्रमाणे समतापूर्ण, सर्वसमावेशक आणि वैविध्यपूर्ण समाजाच्या निर्मितीसाठी सहभागी, उत्पादक आणि योगदान देणारे नागरिक तयार करणे हे याचे लक्ष्य आहे.

RTE २००९ च्या मोफत आणि सक्तीच्या शिक्षणाच्या अधिनियमानुसार सर्व मुलांना 14 वर्षांपर्यंत, तर दिव्यांग मुलांना १८ वर्षापर्यंत मोफत आणि सक्तीचे शिक्षण देण्याचा प्रस्ताव आहे. धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी शिक्षण संचालनालय कसोशीने प्रयत्न करत आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमानुसार, नाशिक महानगरपालिका मुंबई प्राथमिक शिक्षण अधिनियम, १९४७ मधील तरतुदींनुसार शालेय शिक्षण देण्याचे कर्तव्य बजावत आहे. पूर्व प्राथमिक, प्राथमिक, उच्च प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक आणि विद्यापीठ स्तरावर शैक्षणिक सुविधा टप्प्याटप्प्याने पुरविल्या जातात. पूर्व प्राथमिक, प्राथमिक, उच्च प्राथमिक आणि माध्यमिक शिक्षण ही मुख्यतः नाशिक महानगरपालिकेच्या शिक्षण विभागाची जबाबदारी आहे.

नाशिक महानगरपालिकेच्या संपूर्ण शहरात ८८ प्राथमिक शाळा आणि १२ माध्यमिक शाळा आहेत. एकूण विद्यार्थीसंख्या अंदाजे २९००० इतकी आहे.

### व्हिजन

पुढील 2 वर्षात शैक्षणिक आराखड्यांद्वारे नाशिक महानगरपालिकेच्या शाळांमधील एकूणच शिक्षणाचा दर्जा आणि गुणवत्ता सुधारून विद्यार्थी, शिक्षक, कर्मचारी यांच्या जीवनमानामध्ये परिवर्तन घडवून आणणे

**दीर्घकालीन परिकल्पित परिणाम**

- ✓ अध्ययनाच्या गुणवत्तेत सुधारणा
- ✓ जागतिक दर्जाच्या शिक्षणाच्या पायाभूत सुविधांची उभारणी
- ✓ कुशल आणि प्रेरित शिक्षक आणि विद्यार्थी
- ✓ विद्यार्थी जीवनाचा सर्वांगीण विकास




**मनपा शाळा** १००

प्राथमिक शाळा ८८

माध्यमिक शाळा १२

**विद्यार्थी संख्या** २९०००